




# दैनिक अजिंक्य केसरी

RNI.MAHMAR/2023/87479 www.ajinkyakesari.in


**सुविचार**

जिंकायची मजा तेव्हाच असते, जेव्हा अनेकजण तुमच्या पराभवाची वाट पाहत असतात.



## संक्षिप्त

### टाटा मोटर्सने स्तर उंचावला

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोटिव्ह उत्पादक कंपनीने सीएनजी वेईकल श्रेणीमध्ये मोठे प्रयत्न करणे सुरू ठेवले आहे, जेथे मार्केट लीडर म्हणून स्वत:ला प्रस्थापित केले आहे. प्रबळ उत्पादन पोर्टफोलिओ आणि धोरणात्मक उपक्रमांसह कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ च्या पहिल्या सहामाहीत एकूण सीएनजी श्रेणीमध्ये २१.१ टक्क्यांचा प्रभावी मार्केट शेअर संपादित केला. महाराष्ट्रात, या कालावधीदरम्यान ब्रँडच्या एकूण कार विक्रीमध्ये ३४ टक्के सीएनजी वेईकल्स होत्या, ज्यामधून प्रबळ प्रादेशिक वाढ दिसून येते. टाटा मोटर्सची शाश्वत गतीशीलतेप्रती कटिबद्धता विकसित होत असलेल्या ऑटोमोटिव्ह लँडस्केपशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या सक्रिय दृष्टिकोनामधून दिसून येते.

### आयोडिनच्या गुणांमुळे उंचावले जीवनमान

मुंबई : १९८३ पासून टाटा सॉल्ट भारतातील आयोडिन कमतरतेच्या समस्येला तोंड देण्यात आघाडीवर आहे. व्हॅक्यूम- इव्हॅपोरेटेड आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध करणारा पहिला ब्रँड या नात्याने टाटा सॉल्ट लाखो भारतीयांच्या घराघरात पोहोचले आहे. टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फुड्स विभागाच्या अध्यक्ष दीपिका भान म्हणाल्या, 'टाटा सॉल्ट गेल्या कित्येक वर्षांपासून आयोडिन कमतरतेच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आयोडिनचे योग्य प्रमाण असलेले मीठ पुरवण्यासाठी बांधील आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आमचा ब्रँड लाखो भारतीयांचे स्वास्थ्य जपण्यासाठी दर्जेदार उत्पादने पुरवत आहे.'इंडिया आयोडिन सव्हे २०१८-१९ नुसार टाटा सॉल्टने आयोडिन डेफिशियन्सी डिसऑर्डरचे प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### 'आयडीएफसी फर्स्ट अकादमी' लॉन्च

मुंबई : आईडीएफसी फर्स्ट बँकेला 'आयडीएफसी फर्स्ट अकादमी' लॉन्च करण्याची घोषणा करताना अभिमान वाटतो, एक सर्वसमावेशक आर्थिक साक्षरता उपक्रम डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध आहे. ही अकादमी बँकेच्या वित्तीय साक्षरता वाढविण्याचे ध्येय प्रतिबिंबित करते, ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या आर्थिक बाबी चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करता येतात. आयडीएफसी फर्स्ट अकादमी क्लिष्ट आर्थिक विषयांचे अनुसरण करण्यास सोपे, जलद आणि प्रभावी शिक्षणासाठी तज्ज्ञांनी डिझाइन केलेल्या सामग्रीसह सुलभ करते. यात विविध शिक्षण शैलींसाठी ब्लॉग, व्हिडिओ आणि परस्परसंवादी क्विझ आहेत. यात व्यावहारिक समज वाढवण्यासाठी वास्तविक-जगातील परिस्थिती-आधारित क्रिया देखील समाविष्ट आहेत. शेवटी, सहभागींचे शिक्षण ओळखण्यासाठी मान्यता कार्यक्रम देखील आहेत.

### नियोजित सीईटी परीक्षांच्या तारखा बदलणार

पुणे -केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई) बारावीची परीक्षा आणि राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेतल्या जाणाऱ्या सामाइक प्रवेश परीक्षांतील (सीईटी) दोन परीक्षा एकाच वेळी येत असल्याने विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन सीईटी सेलने नियोजित सीईटीच्या तारखा बदलण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सीबीएसईने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार १ ते ४ एप्रिल या कालावधीत बारावीची इतिहास, भाषा विषय आणि गृहविज्ञान (होम सायन्स) आणि मानसशास्त्र या विषयांची परीक्षा आहे.

## परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रस्थानी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यात महाराष्ट्राने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत म्हणजे सप्टेंबर २०२४ पर्यंत सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी एक्स या समाज माध्यमातून दिली. ही गुंतवणूक वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के असल्याचे स्पष्ट करत महाराष्ट्र आता थांबणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे पुन्हा अतिशय आनंदाने सांगतो की, आपला महाराष्ट्र सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात अग्रेसर आहे. आता २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी आली आहे. त्यात अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या चार वर्षांतील सरासरी पाहिली तर १ लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त सहा महिन्यात आल्याचे फडणवीस यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

मी महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाहीही फडणवीस यांनी दिली आहे.

## छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर नंदकुमार घोडीले यांचा शिंदे शिवसेनेत प्रवेश



**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** छत्रपती संभाजीनगरचे उबाठा गटाचे माजी महापौर नंदकुमारजी घोडीले आणि त्यांच्या पत्नी माजी महापौर अनिता घोडीले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबईतील निवासस्थानी येऊन शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला.

यावेळी शिंदे यांनी त्यांचे आणि त्यांच्यासह आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून स्वागत केले.

राजकुमार घोडीले हे छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेत सुरुवातीपासूनच कार्यरत होते.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत एकदा त्यांनी तर एकदा त्यांची पत्नी अनिता घोडीले यांनी महापौरपद भूषविले होते. विधानसभा निवडणुकीत शिवसेना आमदार प्रदीप जयस्वाल यांच्या विरोधात निवडणुकीचे तिकीट मिळालेल्या माजी महापौर किशनचंद तनवाणी यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर उबाठा गटाने घोडीले यांना उमेदवारी देऊन निवडणूक लढवण्यास सांगितले होते. मात्र त्यावेळी त्यांनीही निवडणूक लढवायला नकार दिला होता, त्यानंतर आज त्यांनी शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनीही या पक्षप्रवेशासाठी विशेष प्रयत्न केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेली विकासकामे आणि त्यांची कार्यशैलीने प्रभावित होऊन आपण शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश करत असल्याचे नंदकुमार घोडीले यांनी यावेळी बोलताना सांगितले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदूत्वाचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवत अंगिकारून शिवसेनेची जा वाटचाल पुढे सुरू आहे. गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने केलेल्या विकासकामांनी प्रेरित होऊन अनेक शिवसैनिकांनी आम्हाला साथ देण्याचा निणऱ्य घेतला, आगामी काळात ही संख्या अजून वाढलेली आपल्याला दिसेल असे शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच नंदकुमार घोडीले आणि अनिता घोडीले यांच्या शिवसेना पक्षप्रवेशामुळे छत्रपती संभाजीनगरमधील शिवसेनेची ताकद अधिक वाढणार असून त्याचा पक्षाला नक्की फायदा होईल असा विश्वास शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असल्याने त्यादृष्टीने तत्काळ कामाला लागण्याची सूचना त्यांनी घोडीले यांना दिल्या. पक्षवाढीचे काम करताना लागेल ती मदत सरकारच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाईल असेही शिंदे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## सावित्रीबाई फुले जयंती 'राष्ट्रीय मुक्त शिक्षण दिन' म्हणून साजरा

### इको निडस फाउंडेशनची केजी टू पीएचडी मोफत शिक्षण देण्याची मागणी



**वैजापुर (अजिंक्य केसरी) :** इको निडस फाउंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिवसानिमित्त पाचवा राष्ट्रीय मुक्त शिक्षण दिवस साजरा करण्यात आला या दिवशी फाउंडेशनच्या माध्यमातून केजी टू पीएचडी सर्वांना मोफत शिक्षण मिळावं ही मागणी उचलल्या जाते व यावर्षी राजस्थान महाराष्ट्र मध्य प्रदेश या राज्यातून ही मागणी उचलण्याचं काम संस्थेच्या वतीने करण्यात आले.

त्याचबरोबर छत्रपती संभाजी नगर येथील वैजापूर तालुक्यातील परसोडा गावामध्ये संस्थेच्या वतीने गावामध्ये मोफत शिक्षणाच्या मागणीसाठी रॅली काढण्यात आली त्याचबरोबर गावातील लोकांची सभा घेऊन केजी टू पीएचडी शिक्षण सर्वांना मोफत मिळण्यात यावा तसेच एक राष्ट्र एक शालेय शिक्षण म्हणजे वन नेशन वन एज्युकेशन धोरण बाबल्या जावा याबाबत ठराव करण्यात आला व माननीय पंतप्रधानांना हा ठराव पाठवण्यात येणार आहे याप्रसंगी गावचे उपसरपंच व लाडके नेते राजूभाऊ छानवाल यांनी देशातील अन्य गावांना असा ठराव बनवून आव्हान केले.

देशामध्ये सर्वांना केजी टू पीएचडी शिक्षण मोफत मिळण्याची मागणी लावून धरणारे डॉ. प्रियानंद आगळे यांनी सांगितले की शालेय शिक्षणामध्ये आंतरराष्ट्रीय बोर्ड सीबीएससी बोर्ड राज्य बोर्ड यामुळे शिक्षणामध्ये असमानता निर्माण झालेले आहे. ग्रामीण भागातले व मध्यम वर्गातले मुले यामुळे बारावीनंतरच्या आयआयटी तथा एमबीबीएस सारख्या परीक्षेमध्ये कमी संख्येने जात आहेत ग्रामीण भागातले मुले होतकरू असतात महिने ते असतात परंतु त्यांना शैक्षणिक अभ्यासक्रम हा त्या दर्जाच्या मिळत नसल्यामुळे ते मागे पडत चालले आहेत त्यामुळे देशांमध्ये वन एज्युकेशन वन नेशन हे धोरण यायला पाहिजे याप्रसंगी गावचे सुपुत्र पुरुषोत्तम डिके यांनी शिक्षकांच्या भरतीचा मुद्दा उपस्थित केला व देशभरातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची भरती व्हावी अशी आव्हान केले. ॲड. अत :दीप आगळे यांनी सर्व गावांना आवाहन केले की मोफत शिक्षणाचा ठराव प्रत्येक गावागावांमधून माननीय पंतप्रधानाला पाठवण्यात यावा आजच्या या कार्यक्रमास गावचे सरपंच साहेबराव बारसे श्याम राजपूत माजी सरपंच विशाल जगताप गावचे ग्रामपंचायत सदस्य रमेश मेहर

## समाधान वाणी यांना राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर येथील समाधान तुकाराम वाणी यांना २०२५ चा नुकताच राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे.

महाराजा श्री अग्रसेन महाराज भवन द्वारका, नाशिक येथे ६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी पत्रकारितेतला महत्त्वाचा समजला जाणारा 'दर्पण पुरस्कार' समाधान वाणी यांना दिला जाणार आहे. भूमिका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थाच्या वतीने घेतले जाणारे एकता सन्मान संमेलनाचे दहावे वर्ष असून यावर्षी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिवशी समाधान वाणी यांना सन्मानित करण्यात आहे. संपादक समाधान वाणी यांना दर्पण दिनानिमित्त 'राज्यस्तरीय दर्पण पुरस्कार' दिला जाणार आहे. पत्रकारिता क्षेत्रात महत्वाचा मानला जाणारा हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल समाधान वाणी यांचे पत्रकारितेलील मित्रपरिवार, नातेवाईक व विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## दारू पिण्यास पैसे न दिल्याने पोटच्या पोराने केला बापाचा खून

### आजोबाचा खून केल्याने बापाविरुद्ध मुलाची फिर्याद..

**गंगापुर (अजिंक्य केसरी) :** तालुक्यातील वजनापूर येथे माणुसकीला काळिमा फासणारी दुर्दैवी घटना घडली असून दारू पिण्यास पैसे न दिल्याने पोटच्या पोराने बापाच्या डोक्यात लोखंडी खुर्ची घालून निर्घृण खून केल्याची घटना शुक्रवारी (दि.३) रोजी सकाळी उघडकीस आली असून आजोबांचा खून केल्याबाबत आरोपी बापाविरुद्ध मुलानेच फिर्याद दिली आहे. शिल्लेगाव पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वजनपूर येथे शेतवस्तीवर राहणाऱ्या नंदू शेषराव चव्हाण वय ४९ याने त्याचे वडील शेषराव रंढाज्जी चव्हाण वय. ७५ वर्ष यांचा )दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने गुरुवारी (दि.२) रोजी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास डोक्यात लोखंडी खुर्चीनें मारहाण करून निर्घृण खून केला हि याबाबत शिल्लेगाव पोलिसांना शुकवारी सकाळी माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, उपनिरीक्षक नजीर शेख,श्रीकृष्ण दाणे व हनुमंत सातपुते तात्काळ वजनापूरला शेतवस्तीवार असणाऱ्या गट नंबर २८ मधील घटनास्थळी पोहचले पोलिसांना पाहताच आरोपीनें धूम ठोकली मात्र पोलीस कॉनस्टेबल हनुमंत सातपुते यांनी कपशी व हरभरा असलेल्या शेतात आरोपीचा सिनेस्टाईल पळत जाऊन पाठलाग केला व आरोपीच्या मुसक्या आवळून बेड्या ठोकल्या

घटनेच्या दिवशी घरचे सर्व मंडळी काही कार्यक्रमानिम्मित बाहेरगावी गेलेले होते त्यामुळे नंदुने वडील शेषराव यांना दुपारी एक ते दीड वाजेपासून दारू पिण्यासाठी पैसे मागत होता मात्र वडिलांना नकार दिला तयामुळे नंदूच्या रागाचा परा चढला व वडिलांना चापट बुक्कक्याने मारहाण करत राहिला त्यात संध्याकाळी डोक्यात लोखंडी खुर्ची घातल्याने शेषराव यांचा मृत्यू झाला मात्र सदर घटना शुक्रवारी उघडकीस आली असता आजोबाचा खून करणाऱ्या बापाविरुद्ध आकाश नंदू चव्हाण वय २८ यांच्या फिर्यादिवरून शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दखल करण्यात



आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नजीर शेख करत आहे.

# संपादकीय...

## ... त्याची सुरुवात होऊ शकेल का?

अनेकांच्या मनातील नववर्षाचे संकल्प अजूनही ताजेतवाने असतील. काहींचा त्या दिशेने प्रयत्नही सुरु असतील. त्याबरोबरीने सर्वांनी एक संकल्प जाणीवपूर्वक करणे ही काळाची गरज आहे. 'डिजिटल डिटॉक्स' हा तो संकल्प. म्हणजे नेमके काय? डिजिटल उपकरणांच्या वापरापासून स्वतःला काही काळ ठरवून दूर ठेवणे म्हणजे 'डिजिटल डीटॉक्स'. त्याच्या व्याख्येतच त्याच्या अती वापराचा इशारा दडला असावा का? कारण डिजिटल उपकरणांचा गरजेनुसार वापराशी लोकांची फारकत झाली असून बहुसंख्य लोक त्याच्या आहारी गेले आहेत. व्यसनच जडले आहे असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरू शकेल. हे कोणा ऐऱ्यागैऱ्याचे निरीक्षण नाही. तज्ज्ञांनी अभ्यासाअंती काढलेला निष्कर्ष आहे. या मुद्द्यावर जगभरात सतत सर्वेक्षणे आणि संशोधन सुरु असते. त्याचे निष्कर्ष अधुनमधुन प्रसिद्ध होतात. ते डिजिटल साधनांच्या व्यसनाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधून घेतात. त्यावर सर्वांचे एकमत आढळते. डिजिटल जगाच्या आहारी जाण्याचे भयंकर दुष्परिणाम समाज भोगत आहे. लोक वास्तवापेक्षा काल्पनिक जगातच रमतात. परिमाणी इतरांकडून अवास्तव अपेक्षांमध्ये कमालीची वाढ आढळते. या माध्यमांवर कोणत्याही निमित्ताने भावनांचा पूर वाहतो. लोक एकमेकांना प्रत्यक्ष भेटणे जणू विसरले आहेत. परिणामी भावभावना, संवादातील कायिक-वाचिक चढउतारांचे महत्व आणि जिव्हाळा किती गरजेचा असतो याची जाणीव ही तर फार दूरची गोष्ट झाली आहे. सवय कोणी लावून घेतली याच्या उत्तरातच ती सोडण्याचा उपाय सापडू शकेल. म्हणजेच डिजिटल साधनांचे दुष्परिणाम टाळणे माणसांच्याच हातात आहे. त्याचे उपाय तज्ज्ञांनी सुचवले आहेत. सुचवतही असतात. अनेक सामाजिक संस्था या क्षेत्रात स्वयंस्फूर्त काम करतात. हे सगळेच ठराविक वेळ डिजिटल साधने दूर ठेवायला सांगतात. नव्या वर्षात त्याची सुरुवात करून पाहायला काय हरकत असू शकेल? साधने लांब ठेवल्याने सुरुवातीला कदाचित अस्वस्थ वाटू शकेल. तो वेळ कसा घालवावा हेही सुचणार नाही. मन त्या साधनांकडे ओढा घेऊ शकेल. व्यसन त्यालाच तर म्हणतात. पण तो क्षण एकदा का टाळायची सवय जडली तर ती साधने दूर ठेवल्यांनंतर मिळणाऱ्या वेळेच्या सदुपयोगाचे उपाय देखील गवसतील. निसर्ग खुणावेल. मित्र आठवतील. कुटुंबियांबरोबर गप्पा मारण्यातील, फिरायला जाण्यातील मजा अनुभवणे शक्य होईल. अर्थात यासाठी प्रचंड निर्धार आणि निश्चय करावा लागेल. त्याचे फायदे संत तुकाराम महाराजांनी म निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळफ अशा अनेक अभंगांमधून आणि समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या श्लोकांमधून सांगितलेच आहेत. तेव्हा, नव्या वर्षात त्याची सुरुवात होऊ शकेल का?

## जास्वंद



जास्वंद कसा फुलला
बघा फांदीवर झुलला
भडक लालबुंद रंग
बघताच नजरेत भरला

जास्वंद कसा फुलला
अंगण बागेत बहरला
दिसता फांदीवर फुल
तोडण्यास हात वळला

जास्वंद कसा फुलला
कोमजून खाली पडला
सकाळी टवटवीत सौंदर्य
सायंकाळ निस्तेज ठरला

जास्वंद कसा फुलला
जगण्याचा मर्म दडला
काहीही कायमचे नाही
निसर्गाचा नियम कळला

जास्वंद कसा फुलला
आयुर्वेदिक गुण भरला
मातीशी होण्या एकरूप
जास्वंद बघा तळमळला

**- सौ चैताली संगोपाल वरघट**
मूर्तिजापूर, जि अकोला
९८३४५८३६८५

## उर्जा

पवनचक्क्या देतात
अ पारंपारिक उर्जा
कौतुकास्पदप्रकल्प
उच्च तम असे दर्जा

गुन्हेगारी करी प्रवेश
गुंडाळी लाज लज्जा
फायदा करी विध्वंस
हलू पाहे पुर्जा पुर्जा

निपटू काढे कुवृत्ती
कडक सुनवा सजा
गलिच्छ राजकारण
वेळवर द्यायची रजा

कलंकित अगणित
एकजातो येतो दुजा
उजळचालते कुप्रथा

मलिन करती ध्वजा
पाळेमुळे खणू काढे
मुळीचं नाही गमजा
नवीन हे शक्ती स्त्रोत
निधीक करे समाजा

रोपे उपजे तुळशीची
जमीन इथली उपजा
हवा होईल नियंत्रित
मिसळा पवित्रसबजा

हस्तक्षेप हवा करारी
विचित्र निघे नतिजा
योग्य दिशा प्रकल्पा
गवसणी दे क्षितीजा

**- हेमंत मुसरीफ**
९७३०३०६९९६

# राजकीय हत्या का होतात त्यांचे परिणाम काय?

राजकीय हत्या मोठ्या प्रमाणावर होत असल्याने हा चर्चेचा मोठा प्रश्न म्हणून समोर आला आहे.राजकीय हत्या केवळ भारतातच होतात असे नव्हे तर राजकीय हत्या हा प्रकार जगभर घडत आहे. भारतातील स्थानिक राजकरण्यांपासून तर जागतिक पातळीवर राजकीय हत्या होत आहे.अलीकडे महाराष्ट्रातील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांची हत्येने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे.बिहारमधील राजकीय पक्षांशी संबंधित नेत्यांच्या हत्यांची आकडेवारी पाहिली तर १ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत राज्याच्या विविध भागांत किमान ७ नेत्यांची हत्या करण्यात आली आहे.भारतीय नेत्यांच्या राजकीय हत्येची लिस्ट फार मोठी आहे.भारतातील स्थानिक नेते असो की रशियातील व्लादिमीर पुतिन यांचे विरोधक ॲलेक्सी नवलनी यांचा मृत्यू असो किंवा बिहारमधील असदुद्दीन ओवेसी यांच्या पक्ष एआयएमआयएमचे ज्येष्ठ नेते अब्दुल सलाम उर्फ असुम मुखिया यांची हत्या असो, 'राजकीय हत्या' हा शब्द नेहमीच चर्चेत राहिला आहे प्रश्न हा आहे की. राजकीय हत्या का केली जाते.? हा प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतो आहे.

**राजकीय हत्या म्हणजे काय?**

राजकीय हत्या, हत्या किंवा राजकीय हत्या म्हणजे राजकीय हेतूने राजकीय व्यक्तिमत्व किंवा लोकांचा जीव घेणे. भारतीय ग्रंथांमध्ये राजकीय हत्येचा पहिला उल्लेख चाणक्याच्या 'अर्थशास्त्र'मध्ये आढळतो. चाणक्यने आपल्या पुस्तकात राजकीय हत्यांबाबत सविस्तर विवेचन केले आहे.मौर्य वंशाचे संस्थापक चंद्रगुप्त मौर्य, ज्यांना चाणक्याचे शिष्य म्हटले जाते, त्यांनी नंतर राजकीय हत्येचा वापर केला.भारत सोडताना अलेक्झांडरने आपला सेनापती फिलिप याची भारताचा क्षत्रप (गव्हर्नर) म्हणून नेमणूक केली होती. ३२५ बीसी मध्ये फिलिपची त्याच्याच सैनिकांनी हत्या केली होती. या हत्येचा कट चंद्रगुप्त मौर्याने रचला होता, असे मानले जाते. चाणक्याने ईसापूर्व ३०० मध्ये अर्थशास्त्र या प्राचीन भारतीय राजकीय ग्रंथात याचा उल्लेख केला आहे. मगध सम्राट चंद्रगुप्त आणि बिंदुसार यांचे सल्लागार असलेल्या चाणक्यने राजकीय कारणांसाठी कट रचून प्रमुख व्यक्तींच्या हत्येचे वर्णन राजकीय हत्या असे केले होते. नंतरच्या मध्ययुगीन काळात, अनेक राजांची विषप्रयोगाने किंवा फसवणूक करून हत्या करणे सामान्य होते. त्याच वेळी, द न्यूयॉर्क टाइम्सने अब्राहम लिंकनच्या हत्येचे उदाहरण देत, अनेकदा राजकीय हत्येला राजकीय हत्या असे संबोधले आहे, खून आणि अचानक किंवा गुप्त हल्ल्याद्वारे खुनाचा प्रयत्न, प्रतिष्ठा कमी करणे किंवा नष्ट करणे. १६१० मध्ये इंग्रजी शब्दकोशात assassination हा शब्द पहिल्यांदा वापरण्यात आला.

आपल्या देशाविषयी बोलायचे झाले तर दक्षिणेकडील केरळ आणि पूर्वेकडील बंगाल, ज्यांनी डाव्या पक्षांची राजवट पाहिली आहे, त्याला राजकीय हत्यांचा मोठा आणि रक्ताने माखलेला इतिहास आहे. क्वचितच असे कोणतेही राज्य असेल जिथे राजकीय हत्यांच्या बातम्या येत नाहीत. स्वातंत्र्यानंतर देशातील काही प्रमुख राजकीय



हत्यांबद्दल बोलायचे झाले तर महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी, ललित नारायण मिश्रा, प्रताप सिंग कैरॉन, फूलन देवी, बेअंत सिंग, सफदर हाश्मी, हरेन पंड्या अशी अनेक मोठी उदाहरणे समोर येतात. समोर.
या सर्वांशिवाय इतर अनेक लहान-मोठ्या नेत्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. यामध्ये माजी केंद्रीय मंत्री विद्या चरण शुक्ला, छत्तीसगडचे नेते महेंद्र कर्मा, फुलन देवी, अब्दुल गनी लोन, खासदार कृष्णानंद राय, ऑल इंडिया गोरखा लीगचे अध्यक्ष मदन तमांग यांच्या नावांचा समावेश आहे. याशिवाय जगभरात मोठ्या नेत्यांच्याही हत्या झाल्या. यामध्ये अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी, पाकिस्तानच्या ज्येष्ठ नेत्या बेनझीर भुट्टो, अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन, अमेरिकन नेते मार्टिन ल्यूथर किंग जूनियर आणि पाकिस्तानचे माजी पंतप्रधान लि याकत अली खान यांसारख्या राजकारण्यांचा समावेश आहे.
नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने डिसेंबर २०२३ मध्ये जाहीर केलेल्या २०२२ च्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, देशात राजकीय कारणांमुळे झालेल्या हत्येच्या सर्वाधिक घटना झारखंडमध्ये नोंदल्या गेल्या आहेत. क्राइम इन इंडिया-२०२२ च्या अहवालानुसार, देशभरात राजकीय कारणांमुळे ५९ हत्या झाल्या, त्यापैकी सर्वाधिक १७ राजकीय हत्या झारखंडमध्ये झाल्या. अहवालानुसार, उत्तर प्रदेश, तेलंगणा आणि त्रिपुरामध्ये राजकीय खुनाच्या सर्वात कमी घटनांची नोंद झाली आहे. या तीन राज्यांत राजकीय कारणास्तव हत्येचा प्रत्येकी एक गुन्हा दाखल झाला आहे. झारखंडपाठोपाठ बिहार आणि ओडिशामध्ये प्रत्येकी आठ राजकीय हेतूने खुनाच्या घटना घडल्या आहेत. केरळमध्ये राजकीय हत्येच्या सात घटना, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी चार आणि कर्नाटकात दोन घटना घडल्या.

यापूर्वी बंगाल सरकारने एनसीआरबीला राज्यातील राजकीय हिंसाचार आणि खुनाच्या घटनांबाबत चुकीचा डेटा दिल्याच्या बातम्याही आल्या होत्या. बंगाल पोलिसांकडून माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत मिळालेली माहिती आणि सरकारी आकडेवारी यात मोठी तफावत होती. एनसीआरबीच्या नोंदींमध्ये केरळच्या आकडेवारीवर स्थानिक विरोधी पक्षनेत्यांनीही प्रश्न उपस्थित केले होते. ऑगस्ट २०२१ रोजी केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत २०१७ ते २०१९ दरम्यान झालेल्या राजकीय हत्यांबद्दल सांगितले होते की, यामुळे देशभरात २३० लोक मारले गेले. राजकीय कारणांमुळे मारल्या गेलेल्यांमध्ये झारखंडमधील ४९, पश्चिम बंगाल मधील २७आणि बिहारमधील २६ जणांचा समावेश आहे. २०१७ मध्ये देशात राजकीय कारणांमुळे ९९ जणांचा बळी गेला, तर २०१८ मध्ये देशात राजकीय खुनाच्या ५९ घटनांची नोंद झाली. २०१९ मध्ये राजकीय कारणांमुळे ७२ लोकांचा बळी गेला.

**अशा घटना का घडतात?**

१९९३ मध्ये वोहरा समितीचा अहवाल आणि २००२ मध्ये राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या (NCRWC) अहवालाने भारतीय राजकारणात गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांची संख्या वाढत असल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. लोकसभा निवडणूक २००९ आणि लोकसभा निवडणूक २०१९ या दशकात अशा खासदारांच्या संख्येत एकूण १०९ टक्के वाढ झाली. गंभीर गुन्हेगारी प्रकरणांमध्ये बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण, महिलांवरील गुन्हे इत्यादींचा समावेश आहे. राजकारणाचे हे गुन्हेगारीकरण हे देशातील राजकीय हत्यांचे एक प्रमुख कारण आहे, कारण ते समाजात मसल पॉवर आणि पैशाच्या शक्तीसह हिंसाचाराची मानसिकता वाढवते. राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोगाने अनेक पावले उचलली असली तरी ती अपुरी ठरली आहेत. यासाठी कठोर कायदे करण्याबरोबरच सर्वसामान्यांचे शैक्षणिक स्तर आणि जागरूकता वाढवणे अत्यंत गरजेचे असल्याचे म्हटले आहे.
काळानुरूप या राजकीय हत्यांचे स्वरूपही बदलले आहे. आता या हत्यांना हत्येऐवजी टार्गेट किलिंग म्हटले जात आहे.
जगातील विविध देशांच्या गुप्तचर यंत्रणा आता या कामात गुंतल्या आहेत. इस्त्रायल ची गुप्तचर संस्था मोसाद राजकीय हत्या किंवा सूडबुद्धीच्या हत्यांसाठी कुप्रसिद्ध आहे. म्युनिक ऑलिम्पिकदरम्यान इस्त्रायली खेळाडूंच्या हत्येचा बदला घेण्यासाठी मोसादने अनेक वर्षे युरोपमध्ये आपले एजंट तैनात केले, जे या घटनेला जबाबदार असलेल्या संघटनेच्या लोकांना ठार मारायचे. अनेक पॅलेस्टिनी नेत्यांच्या हत्येतही मोसादचा हात असल्याचे मानले जाते. अमेरिकन गुप्तचर संस्था सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए) ने शीतयुद्धाच्या काळात क्यूबाचे हुकूमशहा फिडेल कॅस्ट्रो यांची हत्या करण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला होता, परंतु त्यांना यश आले नाही.

**- प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**

# खराब हवेचा आरोग्यावर परिणाम

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे. मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात प्रामुख्याने सांगता येण्यासारखे कारणे म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे ही आहेत. मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत. मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी



लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे. मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो. चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा. नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

**श्याम ठाणेदार**

# लाडकी बहिण योजनेबाबद आताच छाननी का! निवडणुकी आधी का नाही!

कोणतीही योजना राबवितांना त्याचा सखोल अभ्यास करायचा असतो व नंतर त्याची पडताळणी करून अमलात आणायची असते.परंतु सरकारने राजकीय हेतू लक्षात घेऊन निवडणुकीचे मोठे शस्त्र म्हणून लाडकी बहिण योजना अंमलात आणली व लाभार्थीनी त्याचा पुर्णपणे लाभ सुध्दा घेत आहे आणि राज्याला पुर्ण बहुमताचे सरकार बहाल केले.परंतु या योजनेमुळे सरकारला घाटा सहन करावा लागणार आहे व याचा परिणाम सरकारी तिजोरीवर पडणार ही बाब लक्षात घेता सरकार अनेक निकष लावून त्याची छाननी करून जीतक्या लाडक्या बहीणी लाभार्थी या योजनेतुन कमी करता येईल तीतक्या कमी करण्याच्या तयारीत सरकार असल्याचे दिसून येते. यासाठी सरकार प्राप्तीकर विभागाची (इन्कम टॅक्स विभागाची)मदत घेतली जाणार आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न, कुटुंबात चारचाकी गाडी असेल अशा महिलांना आता या योजनेचा लाभ मिळणार नाही याची दाट शक्यता आहे. विधानसभा निवडणुकी आधी सरकारने लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे स्वागत सर्वच स्तरातून झाले हि बाब निवडणुकीच्या निकालानंतर दिसून आले.
परंतु आज निवडणूका संपल्या नंतर लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांची छाननी करण्याचा निणऱ्य सरकारने घेतला आहे ही अत्यंत दुर्दैवी व गंभीर बाब आहे. कारण निवडणुकीच्या आधीपासून या योजनेचा लाभ महिला घेत आहे.त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की जेव्हा महिलांनी 'लाडकी बहिण' योजनेचे फॉर्म सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून भरल्या गेले.तेव्हाच सरकारने महीलांच्या फॉर्मची, त्यांच्या घराची,अडीच लाख पेक्षा जास्त उत्पन्न,चारचाकी वाहन,घर, बंगला आहे किंवा नाही, टीव्ही, फ्रीज या संपूर्ण बार्बीची चौकशी का केली नाही.सरकारला आताच कशी काय लाडकी बहिण योजनेच्या निकषाची गरज भासली!यावरून स्पष्ट होते की सरकारच्या तिजोरीत ठणठणाट आहे.
लाडकी बहीण योजना जशी लागु केली तशीच सुरू ठेवायला पाहिजे. कारण लाभार्थीसह अनेक लाडक्या बहीणींनी सरकारला एकतर्फी मतदार करून भरघोस मतांनी सत्तेच्या खुर्चीवर बसले आणि आता सरकार अचानक छाननी करून काही निकष लावत असेल तर हा लाडकी बहिण योजनावर घोर अन्याय समजण्यात येईल.कारण सुरूवातीला कोण गरीब आहे किंवा कोण श्रीमंत आहे किंवा कोण इन्कम टॅक्स पे आहे याची कोणीच तिळमात्र चौकशी केली नाही. कारण सर्वांना निवडुन यायचे होते आणि आता निवडुन आल्यानंतर छाननीची भाषा करून निकष लावने म्हणजे लाडक्या बहीणींना निराश करून त्यांना होत असलेली मदत हीरावल्या सारखे होईल. सरकारमार्फत असेही सांगण्यात येते की लाडक्या बहीणींची सरसकट छाननी नाही.परंतु मी म्हणतो की आपण जशी योजना अंमलात आणली तशीच सुरू ठेवायला पाहिजे यात सरकारला काय अडचण!
लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, आजी माजी आमदार-खासदार मंत्री, यांना दर महिन्याला वेतन, पेंशन,भत्ते व इतर सुविधा सुरळीत मिळते मग सरकारचे १५०० किंवा २१०० रूपयांची लाडक्या बहीणींना सरसकट मदत दिली तर यात सरकारचे काय नुकसान होणार आहे. कारण कोणत्याही महीलांनी किंवा संघटनांनी लाडकी बहिण योजनेची मागणी केलेली नव्हती.हि योजना सरकारने अंमलात आणली आणि सुरूही केली त्याच पध्दतीने पुढेही ठेवली पाहिजे व आणखी लाभार्थीना समाविष्ट केले पाहिजे.सरकारने एकतर योजना आनु नये आणली तर त्याची वचनपुर्ती पुर्ण केली पाहिजे. त्यामुळे सरकारने कोणतीही योजना अंमलात आणायच्या अगोदर त्याचा सखोल अभ्यास करायला हवा नंतरचं ती अमलात आणायची की नाही याचा विचार करायला हवा.आता असे झाले की योजना तर अंमलात आणली याची भरपाई काढण्यासाठी अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर सुध्दा वाढविण्यात आले सोबतच महागाई भरमसाठ वाढतच आहे.परंतु त्यानेही काम भागत नसल्यामुळे आता लाभार्थी महीलांची छाननी करून त्यातून जास्तीत जास्त लाभार्थी महीला कशा कमी करता येईल याकडे सरकारचे लक्ष लागल्याचे दिसून येते.त्यामुळे आज लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महीला द्विधेमध्ये असल्याचे दिसून येते.या योजनेतील लाभार्थींची छाननी म्हणजे या योजनेवर घोर अन्यायच म्हणावा लागेल.

# महाधम्मध्वज महापदयात्रेत लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा - दीपक कदम



**नांदेड (अजिंक्य केसरी) :** नवीन वर्षाच्यानिमित्ताने आणि महाधम्मध्वज महापदयात्रा नियोजनाच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन चालू असलेल्या धम्मसंकल्प इमारत म्हणजेच श्रामणेरांच्या दीक्षाभूमीच्या बांधकामांची पाहणी केली.

यावेळी अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघाची उपस्थिती होती. यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाधम्मध्वज महापदयात्रेत बुधवारी ८ जानेवारी २०२५ रोजी तमाम बौद्ध उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कदम यांनी केले.

ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंतर्गत श्रामणेर प्रशिक्षण केंद्र परिसरात विपश्यना केंद्र, पुस्तकालय तथा वाचनालय, भिक्खू निवास, भव्य भोजन कक्ष आदींचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी दीपक कदम यांनी केली. अल्पावधीमध्ये बेसमेंट लेव्हलपर्यंत काम करण्यात आले आहे. लवकरच पहिल्या स्लॅबचे काम करण्यात येईल असे यावेळी भदंत पंयाबोधी थेरो यांनी सांगितले. हे काम भव्य दिव्य असून खर्चाचा विचार करता समाजातील बांधवांनी योगदान देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन दीपक कदम यांनी केले. यावेळी आंबेडकरवादी मिशनच्या माध्यमातून होत असलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल कदम यांचा श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

### ८ जानेवारीला घरावर पंचरंगी धम्मध्वज उभारावा - भदंत पंय्याबोधी थेरो

८ जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्मध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे यासाठी सन १८८० मध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती करण्यात आली. विश्व बौद्ध धम्मध्वज दिन समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा यासाठी जागतिक धम्मध्वज दिनानिमित्त ८ जानेवारी २०२५ रोजी बौद्ध उपासक किंवा उपासिकांनी आपल्या घरांवर पंचशील धम्मध्वज उभारुन विश्व धम्मध्वज दिन साजरा करावा असे आवाहन तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष, संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र कनाशी येथे महानुभाव पुजारी भोपे महासभेचे अधिवेशन व वर वधू परिचय मेळावा




**चाळीसगाव (अजिंक्य केसरी) :** तालुक्यातील श्री क्षेत्र कनाशी येथे अखिल भारतीय महानुभाव पुजारी भोपे महासभेचे अधिवेशन तसेच वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता. महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. साहेबराव महानुभाव सर यांनी श्री क्षेत्र जाळीचा देव येथील सामाजिक कार्यकर्ते बंटी पुजारी यांच्या कार्याची माहिती घेतली,आणि २८ तारखेला जे अधिवेशन होते त्या अधिवेशनात महानुभाव सरांनी बंटी पुजारी यांना विशेष निमंत्रण दिले. अधिवेशनाच्या १० दिवस आधी सरांनी व्हॉट्सअ‍ॅप वर बंटी पुजारी यांना एक ई सेंड केली होती त्यात अधिवेशनात समाज कार्यार्थ सत्कार स्वीकारण्यासाठी यावे,असे आवाहन करण्यात आले होते. २८ तारखेला बंटी पुजारी यांनी श्री क्षेत्र कनाशी येथे सत्कार स्वीकार केला.

## पैठण तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा-2024उत्सहात संपन्न



**पैठण (अजिंक्य केसरी) :** विकास मिना,मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छ. संभाजीगर व जयश्री चव्हाण, शिक्षण अधिकारी प्राथमिक, यांच्या संकल्पनेतून पंचायत समिती शिक्षण विभाग पैठण अंतर्गत जि. प.शाळेतील पालक व विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद प्रशाला मुलांची पैठण यांच्या मैदानात तीन दिवसीय तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, श्रीराम केदार, गटशिक्षणाधिकारी पं.स.पैठण हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अनिल पुदाट, शिक्षण विस्तारअधिकारी पं.स. पैठण, मुश्ताक शेख,शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.पैठण, हे होते तर निमंत्रीत पाहुणे म्हणून राम सेठ अहुजा, प्रशिद्ध व्यापारी, तथा संचालक सावन कुपाल रुहानी मिशन न्यू दिल्ली. व इरफान बागवान, माजी नगर सेवक हे होते.

समशेर पठाण तालुका क्रीडा समन्वयक,नितीन कपटी, नारायण बहिर, रावी खेडकर, सुनीता जाधव, मनोहर भाकरे, उत्तम खरात, राजेंद्र डुकरे, राजेश पाखरे, संजय गिते, बाळासाहेब पाखरे, प्रविण उंडाळे, आमोल शेळके, बळीराम भुमरे,राम तांगडे, बाबासाहेब यळे, यांनी पंच व गुणलेखकाचे काम चोख पणे बजावले.

या क्रीडा स्पर्धेमध्ये सांघिक खेळ- कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल, क्रीकेट, रस्सी खेच व वैयक्तिक खेळात-गोळा फेक,थाळी फेक, १०० मीटर रनींग,ल ांब उडी, तर मनोरंजनात्मक खेळातृदोरी उड्या,लिंबू चमचा, लंगडी, सांगित खुर्ची इत्यादी खेळ घेण्यात आले, यामध्ये तालुक्यातील सर्व शालेय स्तरातील मुले/मुली, पुरुष व महिला पालक यांनी सहभाग नोंदविला. ताल ुका स्तरीय सांघिक खेळ प्रथम क्रमांक पटकावलेल्या संघाचे व वैयक्तिक खेळातील प्रथम व द्वितीय क्रमांक पटका वलेल्या खेळाडूंचे जिल्हा स्तरवर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

## निराधार वृद्ध आजी आजोबांना वृद्धाश्रमाचा आधार

### वृद्धाच्या मदतीला धावून आले सामाजिक कार्यकर्ते



ािचखलाी **(अजिंक्य केसरी) :** मेहकर तालुक्यातील एका गावातील वयोवृद्ध आजी आजोबा यांना तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे सामाजिक कार्यकर्त्यांनी मिळून दिला आश्रय सविस्तर असे कि सदर आजी आजोबा यांना मुल-मुली असून सुद्धा त्यांना कोणीही सांभाळ करू शकत नाही असे सुरेशअप्पा हाव व परसराम अंभोरे यांनी सामाजिक कार्यकर्ते हिम्मतरावं जाधव, मनोज जाधव, पत्रकार भरत जोगदंडे, दीपक साळवे, राहुल गवई व मच्छिन्द्र मघाडे यांना सांगितले तेव्हा यांनी ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचालित मानवसेवा प्रकल्प अंतर्गत तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, भोकर येथे निराधार बेघर घरातून काढून दिलेले ज्यांना मुल मुली व इतर नातेवाईक असून सुद्धा त्यांना सांभाळू शकत नाही असे आजी आजोबा, यांना सर्व सुविधा देऊन मोफत संगोपन होत आहे.

येथे असलेल्या निराधार वृद्धाना चांगल्या प्रकारचे भोजन, उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा व इतर अत्यावश्यक सेवा देऊन मानवाच्या आयुष्याचा शेवटचा दिवस म्हणजे वृद्धपकाळ हा सुखद व आनंदमई जावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे असे तुकाराम आश्रय वृद्धाश्रम चे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांना बोल ावून सदर आजी आजोबांची हकीकत सांगून त्यांना प्रवेशित करण्याची विनंती केली त्यावर क्षणाचा हि विलंब न करता वृद्धाश्रम च्या नियमानुसार प्रवेश अर्ज भरून चिखली पोलिसात माहिती देऊन आजी आजोबांना वृद्धाश्रमात आश्रय मिळून दिला आहे. यावेळी चिखली पोलिसांनी विशेष सहकार्य केले. वृद्ध आजीआजोबा ना सामाजिक कार्यकर्त्यांनी वृद्धाश्रमात आश्रय दिल्याने यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### केंद्रपुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत उल्हास मेळावा संपन्न

**सोयगाव (अजिंक्य केसरी) :** तालुकास्तरीय केंद्रपुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत उल्लास मेळाव्याचे आयोजन गटशिक्षणाधिकारी आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली जि प के प्रा शा सोयगाव येथे करण्यात आले होते. उल्लास मेळाव्यात एकूण आठ केंद्रांनी सहभाग घेतला. आठही केंद्राने दिलेल्या थीम नुसार अतिशय उत्कृष्टपणे असाक्षर व्यक्तीमध्ये पायाभूत साक्षरता म्हणजे वाचन, लेखन, संख्याज्ञान, महत्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध माध्यमाच्या आधारे अध्यापन करण्याकरीता लागणारे शैक्षणीक साहित्य तयार करून साहित्याची मांडणी करून आपले स्टॉल मांडले. भजनी मंडळ ने यावेळी विशेष लक्ष वेधून घेतले होते.मेळाव्यास प्रमुख उपस्थिती म्हणून दादाराव आहिरे पंचायत समिती होते, केंद्रप्रमुख फिरोज तडवी,अण्णा पोळ, आदी उपस्थित होते. मेळाव्यातील प्रत्येक स्टॉल उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले होते. अतिशय उत्स्फूर्त पणे सुंदर प्रकारे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



छत्रपती संभाजीनगर : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने बळवंतराव वराळे स्मृती प्रतिष्ठान औरंगाबाद यांच्या वतीने मालती वराळे यांच्या अध्यक्षतेखाली सामोहिक अभिवादन कार्यक्रम तसेच महिला व मुलींसाठी स्पर्धा घेऊन सावित्रीबाई फुले ची जयंती जेतवन संस्कार केंद्र येथे साजरी करण्यात आली.

# सावित्रीबाईंचा आदर्श सर्वांनी घ्यावा -जयश्री सोनकवडे

**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी खूप काम केलेले आहे. त्यांच्या कामाची माहिती आणि जाणीव जागृती महिलांना व्हावी तसेच त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केलेली होती .त्यामुळेच शाळेमध्ये शिक्षण घेऊन आज अनेक महिला उच्च पदावर ती पोहोचलेल्या आहेत. सावित्रीमाई यांचा आदर्श आपल्या डोळ्यापुढे ठेवून सर्व महिलांनी काम करावे. आईने घरामध्ये मुला-मुलींना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयीची माहिती देण्यासाठी स्वतः त्यांचे कार्य समजून घ्यावे असे प्रतिपादन श्रीमती जयश्री सोनकवडे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण उपायुक्त यांनी प्रादेशिक उपायुक्त कार्यालय समाज कल्याण विभागाच्या वतीने आणि आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान तसेच दामिनी महिला संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महत्वाच्या कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी त्यांनी माय माझी सावित्री स्वलिखित कवितेचे वाचन सुद्धा केले. यावेळी दिनदर्शिकेचे सुध्दा अनावरण करण्यात आले.



श्रीमती कांचन मिरघे पोलिस उपनिरीक्षक दामिनी पथक यांनी सुद्धा महिलांना कायदेविषयक माहिती सांगताना महिलांवरती कुठलाही अन्याय अत्याचार झाला तर तुम्ही तातडीने दामिनी पथकाकडे या आम्ही तुम्हाला योग्य ते सहकार्य करू असे आश्वासन यावेळी महिलांना दिले. अ‍ॅड. संगीता शर्मा यांनी महिलांसाठी असलेले कायदेविषयक बाबींचा सविस्तर असे मार्गदर्शन महिलांना केले. त्याचबरोबर भारतीय संविधानातील संविधानाने महिलांना महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या कार्यांना उजाळा दिला.

यावेळी डॉ.दिव्या पाटील यांनी सुद्धा त्या महिलांसाठी किती उत्कृष्ट काम करतात याची माहिती सर्व महिलांना दिली त्याचबरोबर सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरती ऑनलाईन वक्तृत्व नाटिका स्पर्धा कार्यक्रम दिव्या पाटील यांनी घेऊन महिलांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयीची आणि कार्याविषयी माहिती सविस्तर देऊन जाणीव जागृती मोठ्या प्रमाणात केली असल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

यावेळी आऊ साहेब सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने सर्व महिलांना प्रमाणपत्र सुद्धा देण्यात आले. वक्तृत्व स्पर्धात सहभागी झालेल्या महिलांना प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक आलेल्या महिलांना सुद्धा ट्रॉफी देण्यात आली. यावेळी प्राध्यापक चंद्रकांत भराट आणि सुरेश वाकडे बुलंद छावा संघटना यांनीही मार्गदर्शन केले.

जयश्री शिर्के यांनी सुद्धा महिलांविषयी विविध कार्यक्रम घेत असतात. त्याचबरोबर दामिनी महिला संघर्ष समितीच्या वतीने महिलांना योग्य ती कायदेशीर मदत देऊन त्यांचे पुनर्वसन करणे तसेच त्यांच्यावरती आलेल्या संकटाचे निवारण करून महिलांना चांगले जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करत असतात असे त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये यावेळी सांगितले. इंडो जर्मन या संस्थेकडून महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबत सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी उद्योग करावा यासाठी राजेश चंचलानी आणि मनोज ठाकरे यांनी यावेळी सांगितली.

या कार्यक्रमाचे आभार प्रदीप भोगले यांनी मांडले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचाल न श्रीमतीवर वैशाली काळासरे यांनी केले प्रास्ताविक श्रीमती बेबी दांडगे यांनी केले. यावेळी असंख्य महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## अन्न व औषध प्रशासन कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**बुलढाणा (अजिंक्य केसरी) :** अन्न व औषध प्रशासन बुल ढाणा येथे आत क्रांतीज्योती सावित्राबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमांचे अध्यक्ष अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त प्र.शि.पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पन करुन सावित्राबाई फुले यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी जी. के. वसावे, रोखपाल एम.जे. खुर्दे, प्रमुख लिपीक जयंत झोपे, श्रीकांत मोरे तसेच कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### सोमवारी लोकशाही दिन

**बुलढाणा (अजिंक्य केसरी) :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार जानेवारी महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे.

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक **समाधान तुकाराम वाणी** यांनी सोलापूर तरूण भारत मिडीया लि., ए-३२,औरंगाबाद इंडस्ट्रीयल को.ऑप.,सोसायटी, रेल्वे स्टेशन, एमआयडीसी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महा.) ४३१००५, येथे मुद्रित करुन मानिकनगर, नारेगाव, छत्रपती संभाजीनगर (महा). ४३१००७ मो.:**९८८१९५२५१०** येथे प्रकाशित केले आहे. इमेल dailyajinkyakesari@gmail.com आरएनआय.एमएएचएमएआर/२०२३/८७४७९

Printed, Published and Owned by **SAMADHAN TUKARAM WANI** Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd. A-32, Aurangabad Indstrial.Co.Op. Society railway Station , MIDC, Station Road, Chhatarapati Sambhajinagar(MH) 431005 and Published at Manik Nagar, Naregaon, Chhatarapati SambhajiNagar, (MH). 431007 Mob.: **9881952510** Email - dailyajinkyakesari@gmail.com **RNI. MAHMAR/2023/87479**